**जुलै व ऑगस्ट २००६ च्या पुरामुळे निराधार व बाधित झालेल्या कुटुंबाना सानुग्राह अनुदान व अन्नधान्य वाटप**

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक - सीएलएस-०८/२००६/प्र.क्र.३४१/म-३,

दिनांक :१६ ऑगष्ट २००६.

वाचा :

१) शासन ठराव, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-५९८३/२४८३६१/प्र.क्र.८२०/म-३, दि. ३१ जानेवारी, १९८३.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-८-९७/प्र.क्र.१८९/म-३, दि. २६ ऑगस्ट, १९९७.

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-८-९७/प्र.क्र.१८९/म-३, दि. २२ डिसेंबर, १९९९.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-०४-०२/प्र.क्र.१९०/म-३, दि. १७ मे, २००२.

५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-०६-०४/प्र.क्र.१६८/म-३, दि. १९ ऑगस्ट, २००४.

६) शासन पूरक परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-०७/०५/प्र.क्र.१९२/म-३, दि. ५ ऑगस्ट, २००५.

७) शासन निर्णय क्रमांक : सीएलएस ०७-०५/प्र.क्र.१९२(१)/म-३, दि. ६ ऑगस्ट, २००५

८) शासन निर्णय क्रमांक : सीएलए-०८-०५/प्र.क्र.१९२)/(छो.व्या)म-३ दि. १ सप्टेंबर, २००५.

९) शासन निर्णय सीएलएस ०७-०५/प्र.क्र.१९२(शेती)/म-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००५

१०) शासन निर्णय क्रमांक : सीएलएस ०७-०५/प्र.क्र.१९२ (शेतजमीन व बेपत्ता व्यक्ती-मदत)म-३, दि. १९ सप्टेंबर, २००५.

११) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-०६-०४/प्र.क्र.१६८/म-३, दि. १७ जून, २००६.

१२) शासन निर्णय क्रमांक - सीएलएस-०८/२००६/प्र.क्र.३४१/म-३, दिनांक :१० ऑगष्ट २००६.

प्रस्तावना

राज्यात जुलै ऑगस्ट २००६ या महिन्यात अतिवृष्टी/पूर यामुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र सीएलएस-०८/२००६/प्र.क्र.३४१/म-३ दि. १० ऑगस्ट २००६ व समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि. १० ऑगस्ट २००६ नुसार आदेश काढण्यात आले आहेत. अतिवृष्टीमुळे व धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनास स्थानिक स्थितीनीरुप तत्कालिन स्थितीचे गांभिर्य व धोका लक्षात घेऊन घ्यावा लागलेला आहे. अतिवृष्टीच्या कालावधीत निराधार झालेल्या कुटुंबाव्यतिरिक्त ज्या कुटुंबाना सुरक्षित ठिकाणी हलविले आहे आणि त्यांच्या घरात पुराचे पाणी शिरुन नुकसान झालेले आहे अशा कुटुंबाना आर्थिक मदत देण्याबाबत मागणी करण्यात आली अहे. सदर बाबीवर

दि. १६ ऑगस्ट २००६ च्या मंत्रीमंडळ उपसमिती बैठकीत याविषयी चर्चा होऊन अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. दि. १७ ऑगष्ट २००६ च्या मंत्रीमंडळ बैठकीत यावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आलेला आहे.

**शासन निर्णय**

१. शासन निर्णय क्र सीएलएस-०८/२००६/प्र.क्र.३४१/म-३ दि. १० ऑगस्ट २००६ मधील परिच्छेद ४ वगळण्यात येत असून त्याऐवजी पुढील निर्णय सुधारित परिच्छेद ४ समाविष्ट करण्यात येत आहे.

सुधारित परिच्छेद ४ -

**"अतिवृष्टीच्या कालावधीत निराधार झालेल्या कुटुंबाव्यतिरिक्त ज्या कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविले आहे वत्यांच्या घरात पुराचे पाणी शिरुन नुकसान झालेले आहे अशा कुटुंबातील प्रतिव्यक्तीस रु. १०००/- याप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात यावे. प्रति कुटुंब रु ५०००/- या मर्यादेत अनुदान देण्यात यावे".**

**२. समक्रमांकाचा शासन निणय १० ऑगष्ट २००६, चे "परिच्छेद २अ" मधील ओळीने येणारे २ रे वाक्य "पुरामुळे ज्या व्यक्ती .............सानुग्रह अनुदान देय होईल" हे वगळण्यात येत आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भू. प्र. पांडेय)
प्रधान सचिव(मदत व पुनर्वसन)

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
४) सर्व महानगरपालिका आयुक्त.
५) सर्व मुख्य अधिकारी, नगर परिषद.
६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी.
८) सर्व संबंधित विभाग, मंत्रालय,मुंबई - ३२.
९) म-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई - ३२.

प्रत माहितीसाठी सादर / अग्रेषित -

१) मा.मुख्य सचिव.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३) मा. मंत्री पुनर्वसन यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री पुनर्वसन यांचे खाजगी सचिव.